सुधारीत संचारबंदी आदेश

जा.क्र.पोआ/४१६१ /२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड
दिनांक - १८/०७/२०२०

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक १४/०७/२०२० चे ००:०१ ते २३/०७/२०२० चे २४:०० वा. चे दरम्यान पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्राकरिता संचारबंदी व वाहतुक मनाई सुधारीत आदेश.**

१. ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात, पिंपरी चिंचवड शहरात गतीने पसरत आहे, असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. महाराष्ट्र शासनाने आदेश नं. डीएमयु/२०२०/ सीआर.९२/ डीआयएसएम-१ दिनांक. २९.०६.२०२० अन्वये कोव्हिड- १९ चे नियंत्रणासाठी राज्यात यापुर्वी जारी करण्यात आलेल्या लॉकडाऊन आदेशाची मुदत दि.३१.०७.२०२० अखेर वाढविलेली आहे.

२. ज्या अर्थी संदर्भ मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांचकडील जि.का./ क्रं.आ.व्य/ कावि/ १९९९/ २०२०, दिनांक १३.०७.२०२० तसेच आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका जा.क्र./ वैद्य/ ९/ ४०६६/ २०२० दिनांक १२/०७/२०२०, जा.क्र./ वैद्य/ ९/ ४०७१/ २०२० दिनांक १३/०७/२०२० व जा.क्र./ वैद्य/ ९/ ४१००/२०२० दिनांक १८/०७/२०२० अन्वये आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दित कोविड १९ चा प्रतिबंधकरण्यासाठी दिनांक १४.०७.२०२० चे ००.०१ वा. ते दिनांक २३.०७.०२० चे २४.०० वा चे दरम्यान संपुर्ण टाळेबंदी (लॉकडाउन) घोषीत केला आहे.

३. त्या अर्थी मी संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१.०४.१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये कोणत्याही व्यक्तीला पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हददीत कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली याठिकाणी संचार करणे, वाहतुक करणे, फिरणे, उभे राहणे, थांबुन राहणे, रेंगाळणे,सर्व कृत्यास तरतुदींच्या अधिन राहुन सुधारीत संचारास मनाई व वाहतुक मनाई दिनांक १४.०७.२०२० चे ००.०१ वा. ते दिनांक २३.०७.०२० चे २४.०० वा चे दरम्यान लागू केले आहेत.

४. सदर आदेशात नमुद केले प्रमाणे १९.०७.२०२० ते २३.०७.२०२० या काळात लॉकडाऊन शिथील होणार आहे. परंतु लॉकडाऊन शिथील होताना दुकानांमध्ये/ बाजारपेठेत होणा-या संभाव्य गर्दीचा विचार करता कोव्हिड-१९ चे संभाव्य संक्रमण टाळण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हदीत फक्त दिनांक १९.०७.२०२० रोजी सर्व किराणा दुकाने, सर्व किरकोळ व ठोक विक्रेते, सर्व इतर व्यावसाय करणारे व्यापारी दुकाने, मोंढा/ मंडई/ आडत भाजी मार्केट/ फळे विक्रेते/ आठवडी व दैनिक बाजार/ फेरीवाले, मटन, चिकन, अंडी, मासे इत्यादीची विक्री करणारी दुकाने सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०६.०० वाजे पर्यत चालू राहतील. व दिनांक २०.०७.२०२० ते २३.०७.२०२० पर्यंत उपरोक्त सर्व प्रकारचे व्यवसाय सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० वाजे पर्यंत चालू राहतील.

सदरचा आदेश आज दिनांक १८.०७.२०२० रोजी दिलेला आहे.

(सुधीर हिरेमठ)
पोलीस उप-आयुक्त,
विशेष शाखा,
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड करीता

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :- १८.०७.२०२०

Scanned with CamScanner